I.O. प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** नानलपेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0203 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/04/2024 02:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date From (दिनांक पासून):** 15/04/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 15/04/2024
**Time From (वेळेपासून):** 19:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/04/2024 **Time (वेळ):** 01:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/04/2024 01:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सरकारी दवाखाना परभणी, पोलीस चौकी परभणी,परभणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सचिन मारोती लटपटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गजानन नगरी ,कोद्री रोड, गंगाखेड ,गंगाखेड,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गजानन नगरी ,कोद्री रोड, गंगाखेड ,गंगाखेड,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850527777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ASI संजय सिताराम मुंढे | | | 1. पोलीस वसाहत परभणी,परभणी, नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 20 नोटा | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 16.04.2024

फिर्याद

मी सचिन मारोती लटपटे वय 32 वर्षे व्यवसाय शेती रा. गजानन नगरी कोद्री रोड, गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी मो. न. 9850527777.
समक्ष पोलीस ठाणे नानलपेठ, परभणी येथे फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणार असुन शेती व्यवसाय करुन आपल्या कुटुंबाची उपजिवीका भागवितो.
दिनांक 15/04/2024 रोजी मी अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथे लेखी तक्रार दिली की, मी वरील ठिकाणचा राहणार असुन शेती व्यवसाय करुन आपली उपजिवीका भागवितो. माझी बहीण शर्मिला हिचे पती जगन्नाथ आंधळे रा. गंगाखेड यांना दिनांक 04/04/2024 रोजी गंगाखेड येथील विरभद्र जार प्लँटचे समोर सलमान सय्यद व इतर दोन लोकांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरुन गंभीर मारहाण केली. त्यामुळे माझ्या भावजीला परभणी येथील पार्वती अंबोरे मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल येथे अॅडमीट केले. हॉस्पीटल ने त्यांची एम.एल.सी. पोलीस स्टेशन नवामोंढा यांना कळविली होती. पोलीस स्टेशन नवा मोंढा येथील ASI संजय मुंढे हे माझ्या भावजीचा जबाब घेण्यासाठी आले. माझ्या भावजीस गंभीर मार असल्याने ते बेशुध्द होते. त्यांच्या तोंडास मार असल्याने त्यांना बोलता येत नव्हते म्हणुन ASI संजय मुंढे यांनी त्यांचा जबाब घेतला नाही. दिनांक 12/04/2024 रोजी हॉस्पीटल मधुन माझ्या भावजीस डिसचार्ज मिळणार होता. म्हणुन पोलीस स्टेशन नवा मोंढा येथील ASI संजय मुंढे यांना जबाब घेण्यासाठी वारंवार फोन केला. ASI संजय मुंढे सायंकाळी 07ः00 वाजता पार्वती अंबोरे मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल येथे आले. माझ्या भावजीस बोलता येत नव्हते म्हणुन त्यांनी दिनांक 04/04/2024 रोजी घडलेल्या घटनेचा लेखी जबाब लिहुन ठेवला होता. परंतु ASI संजय मुंढे यांनी माझ्या भावजीस त्यांचा लेखी जबाब घेण्यास नकार देवुन गंगाखेड येथे घडलेल्या घटनेचे साक्षीदार श्री मोहन शिवाजी गिते यांचा जबाब घेतला. त्यावेळी त्यांनी माझ्या भावाजीचे भाऊ वैजनाथ आंधळे यांना एम.एल.सी. चा जबाब घेतला म्हणुन त्यांना 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन यांचेकडुन 5,000/- रुपये घेतले आहेत.
आज दिनांक 15/04/2024 रोजी ASI संजय मुंढे यांनी मला फोन करुन म्हणाले की, तुमच्या भावजीच्या एम. एल.सी. चा जबाब चांगला घेतला. मी तुमचे काम केले आहे. तुम्ही मला येवुन भेटा. तुम्हाला आणखी पैसे द्यावे लागतील. असे म्हणाले आहेत. यावरुन त्यांची माझ्या भावजीचा एम.एल.सी. च्या घेतलेल्या जबाबासाठी माझेकडुन लाच घेण्याची इच्छा आहे.
माझे ASI संजय मुंढे यांचे सोबत यापुर्वी कोणत्याही प्रकारचा देवाण-घेवाणीचा व्यवहार नाही किंवा त्यांच्या सोबत माझी दुष्मनी नाही.
मी दिनांक 15/04/2024 रोजी ASI संजय मुंढे यांना ते मला ज्या ठिकाणी बोलवतील त्याठिकाणी जावुन भेटणार आहे. त्यादम्यान त्यांनी स्वतः अगर इतरामार्फत मला माझ्या भावजीच्या एम.एल.सी. च्या घेतलेल्या जबाबासाठी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी.
पोलीस निरीक्षक श्री. वाघमारे एसीबी, परभणी यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथुन उपलब्ध करुन घेतलेले दोन शासकीय पंच नामे 1.श्री वाल्मिक सखाराम गिते वय 35 वर्श, व्यवसाय वरिष्ट लिपीक व 2.श्री अभिजीत पंजाबराव पंतगे, वय 26 वर्श, व्यवसाय कनिष्ठ लिपीक यांचे सोबत माझी ओळख करून दिली. त्यांना मी माझी तक्रार तोंडी कथन केली. माझी हस्तलिखीत तक्रार पोनि श्री वाघमारे यांनी पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचांनी माझी तक्रार वाचून त्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघमारे साहेब यांचे सुचनेवरुन पोलीस हवालदार निलपत्रेवार यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या कडे देवुन मला पंच क्र.01 वाल्मिक गिते यांचे सह माझ्याजवळील मोटारसायकल क्रमांक एम एच 12 आर एक्स 4566 ने ASI संजय मुंढे

यांची भेट घेवुन पडताळणी करण्यासाठी रवाना केले. पडताळणी कार्यवाही दरम्यान मी पार्वती अंबोरे मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल परभणी येथे जावुन ASI संजय मुंढे यांना फोन केला त्यावेळी त्यांनी मला सरकारी दवाखाना परभणी येथील पोलीस चौकीत येण्यास सांगितले, म्हणुन मी पंच क्रमांक 01 वाल्मिक गिते यांचे सोबत सरकारी दवाखाना परभणी येथील पोलीस चौकीत गेलो. तेथे माझी पंच क्रमांक 01 वाल्मिक गिते यांचे समक्ष ASI संजय मुंढे यांची भेट झाली. भेटी दरम्यान ASI संजय मुंढे यांचे सोबत माझ्या भावजीच्या एम.एल.सी. च्या घेतलेल्या जबाबा चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी मला म्हणाले की, भावजीच्या एम.एल.सी. च्या घेतलेल्या जबाबासाठी मला 5,000/- रुपये मिळाले आहेत. आणखी 10,000/- रुपये द्या असे म्हणून त्यांनी मला 10,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, एम.एल.सी. च्या जबाबासाठी दहा - पंधरा हजार रुपये लागतेत का? त्यावेळी त्यंानी मला 10,000/- रुपये आणुन द्या असे म्हणाले. मी त्यांना होकार देवुन पैसे घेवुन येण्यासाठी अर्धा तासाचा वेळ मागुन घेतला. त्यानंतर मी व पंच क्र 01 वाल्मिक गिते एसीबी कार्यालय, परभणी येथे परत आलो. त्यानंतर पोनि वाघमारे साहेब यांनी पंच क्र. 02 पंतगे यांचे समक्ष मला व पंच क्रं. 01 वाल्मिक गिते यांना पडताळणी कार्यवाहीत घडलेल्या घटना क्रमांबाबत विचारपुस केली. व डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये पडताळणी कार्यवाहीत रेकॉर्ड झालेले माझे व ASI संजय मुंढे यांचे संभाशण दोन्ही पंचासमक्ष ऐकले. त्यावेळी ASI संजय मुंढे यांनी मला माझ्या भावजीच्या एम.एल.सी. च्या घेतलेल्या जबाबा 10,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा पुर्व व सापळा कार्यवाहीत ASI संजय मुंढे यांनी मागणी केलेली लाच रक्कम 10,000/- रुपये मी पंचासमक्ष हजर केली. सापळा पथकाने मी हजर केलेल्या रकमेच्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन घेतले. त्यानंतर पोलीस शिपाई/अतुल कदम यांनी अॅंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर मी जमा केलेल्या लाचरकमेस अॅंथ्रासिन पावडर लावुन ती माझ्या अंगावरील शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात पोलीस शिपाइ कदम यांनी अलगद ठेवुन दिली. त्यानंतर पोलीस हवालदार निलपत्रेवार यांनी व्हाईस रेकॉर्डरबाबत पुर्वीप्रमाणे माहिती देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणी साठी वापरलेले मेमरी कार्ड नवीन फाईल तयार होईल. त्या फाईल मध्ये सापळा कार्यवाहीत माझे व ASI संजय मुंढे यांचे भेटी दरम्यान होणारे संभाषण रेकॉर्ड होईल असे सांगुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला पंच क्र 1 वाल्मिक गिते यांचेसोबत माझ्याजवळील मोटारसायकलने सरकारी दवाखाना परभणी येथील पोलीस चौकीकडे पाठविले. आमचे पाठोपाठ अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथील सापळा पथक आले. मी सरकारी दवाखाना परभणी येथील पोलीस चौकीत पंच क्रमांक क्र 1 वाल्मिक गिते यांचेसोबत गेलोत. चौकीत लोक असल्यामुळे आम्ही चौकीत बसलो. काही वेळाने लोक गेल्यानंतर ASI संजय मुंढे हे चौकीतील दाराजवळ येवुन त्यांनी मला लाचेची रक्कम मागितली. त्यावेळी मी त्यांना माझ्या जवळील 10,000/- रुपये अॅंथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम काढुन दिली. त्यावेळी त्यांनी मला किती हेत विचारले असता मी त्यांना 10,000/- रुपये आहेत मोजून घ्या असे म्हणालो, त्यावेळी त्यांनी लाचेची रक्कम 10,000/- रुपये त्यांच्या डाव्या हाताने स्विकारुन त्यांच्या अंगावरील युनिफार्मच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी ASI संजय मुंढे यांनी लाचरक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी संपुर्ण सापळा पथकाने ASI संजय मुंढे यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर पोनि श्री वाघमारे यांनी ASI संजय मुंढे यांना सापळा पथकाची ओळख करुन देवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव संजय सिताराम मुंढे वय 55 व्यवसाय सहाय्यक पोलीस उप निरीक्षक 5027 नेमणुक पोलीस स्टेशन नवा मोंढा रा. पोलीस वसाहत परभणी असे सांगितले. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष सदरची रक्कम हि कोणाच्या सांगण्यावरुन घेतली आहे असे विचारले असता त्यांनी सदरची रक्कम ही स्वतःसाठीच घेतली असल्याचे सांगितले.

त्यानंतर ASI संजय सिताराम मुंढे यांनी माझे कडुन स्विकारलेली 10,000/- रुपये लाचरक्कम पंचासमक्ष त्यांचे अंगावरील युनिफार्मच्या पॅन्टच्या डाव्या खिशातुन बाहेर काढली. दोन्ही पंचांनी ती रक्कम ही लाचेची असल्याची पडताळणी करुन खात्री केली. त्यानंतर पोलीस चौकीतील लाईट बंद करुन कृत्रीम अंधार करुन ASI संजय सिताराम मुंढे यांच्या दोन्ही हातांच्या बोटाच्या पे-यावर, लाचेच्या रक्कमेवर व अंगावरील युनिफार्मच्या पॅन्टच्या डाव्या खिशात अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकुन पाहिले असता त्यावर हिरवट चकाकी स्पर्श दिसुन आली. त्यानंतर ASI संजय सिताराम मुंढे यांना सापळा पथकाने ताब्यात घेवुन अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथे आले. दिनांक 15/04/2023 रोजी सरकारी दवाखाना परभणी येथील पोलीस चौकीत करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान ASI संजय सिताराम मुंढे यांनी माझे भावजी जगन्नाथ आंधळे रा. गंगाखेड यांच्या एम.एल.सी. वरुन घेतलेल्या जबाबासाठी पंच क्र 1 वाल्मिक गिते यांचे समक्ष मला 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती 19.15 ते 19.37 वाजे दरम्यान सरकारी दवाखाना परभणी येथील पोलीस चौकीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीत पंच क्र 1 वाल्मिक गिते यांचेसमक्ष 10,000/- रुपये लाचरक्कम स्वतः स्विकारली. म्हणुन माझी

त्याचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
CHITAMBAR Shankarrao KAMTHEWAD(I (Inspector)) / POBN84808 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
P.I. सदानंद वाघमारे सा. A.C.B. परभणी
**Rank (पद):** **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Sachin

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** CHITAMBAR Shanka
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN84808

ASI
पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे. नानलपेठ. परभणी